# आळंदी येथे वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद १९ व २० जुलैला

## ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार

**पुणे (प्रतिनिधी)–** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे व एमआयटी–राष्ट्रीय सरपंच संसद यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद १९ व २० जुलै २०२५ रोजी हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार आहेत. अशी माहिती परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, हभप यशोधन महाराज साखरे आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून ही गोलमेज परिषद होत आहे.

या परिषदेचा शुभारंभ शनिवार, १९ जुलै रोजी दुपारी ३.०० वा. होणार आहे. या समारंभासाठी राज्याचे अन्न व औषधे प्रशासन विभागाचे मंत्रीनरहरी झिरवाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या सत्रात विधान परिषदेचे सदस्य श्रीकांत भारतीय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, खांडबहाले डॉट कॉमचे निर्माते डॉ. सुनिल खांडबहाले हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

तसेच २० जुलै रोजी होणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल या विषयावर सकाळी ९.३० वा. होणाऱ्या तृतीय सत्रामध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सामाजिक कार्यमंत्री आशिष शेलार हे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून उपस्थित राहतील. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सल्लागार वैभव डांगे व अभय टिळक उपस्थित राहणार आहेत.

वारकरी संप्रदायाची २१व्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची दिशा, स्वरूप, समस्या व आव्हाने आणि निराकरणाची संभाव्य कृतिशील उपाययोजना हा या परिषदेचा प्रमुख विषय असणार आहे. परिषदेत वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून होत असलेले मौलिक लोककल्याणाचे कार्य, आध्यात्मिक प्रबोधनाबरोबरच लोक जीवनातील विविध दैनंदिन समस्यांच्या निराकरणासाठी अधिकाधिक कसे उपयोगी होईल. या विषयावर विविध अंगाने विचारमंथन करून सामाजिक प्रबोधनाचे नवीन विषय व कार्याची निश्चित दिशा ठरविली जाणार आहे. वारकरी संप्रदायाच्या प्रबोधन कार्याच्या विस्ताराला सहाय्यभूत होणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

उद्घाटनानंतर दोन दिवसात एकूण चार सत्रात ही परिषद संपन्न होईल. २१ व्या शतकातील प्रमुख सामाजिक समस्यांचे स्वरूप व आव्हाने, वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची लोककल्याणकारी वाटचाल, वारकरी संप्रदाय–२१व्या शतकातील प्रबोधनाचे स्वरूप, समस्या व आव्हाने, वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनातील आव्हाने व समस्या निराकरणाची संभाव्य उपाययोजना या विषयावर सत्रे होतील. महाराष्ट्र राज्यातून ख्यातनाम कीर्तनकार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व आदर्श सरपंच या परिषदेत आपले मौलिक स्वरूपाचे विचार व्यक्त करतील.

# आंदोलने थांबवण्यासाठीच ‘जनसुरक्षा कायदा’

## डॉ. अजित नवलेंचा सरकारवर हल्लाबोल

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने नुकताच पारित केलेला जनसुरक्षा कायदा हा लोकांच्या विचारस्वातंत्र्यावर गदा आणणारा आणि काही विशिष्ट उद्योगपतींना फायदा मिळवून देण्यासाठीच तयार करण्यात आल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी तीव्र आंदोलन छेडले आहे. या कायद्याला विरोध दर्शवण्यासाठी काल पुण्यात काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली, तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) राज्यभर जनजागृती मोहीम सुरू केली आहे.हा कायदा सरकारविरोधात बोलणाऱ्यांवर दबाव टाकण्यासाठी वापरला जाऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.

शुक्रवारी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी सध्याच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करत जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा येत असल्याची चिंता व्यक्त केली. त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका केली.

डॉ. नवले म्हणाले, सरकारच्या विशेष मेहरबानीस पात्र ठरलेल्या काही उद्योगपतींना महाराष्ट्रातील साधनसंपत्ती लुटता यावी, यासाठी राज्यात विविध तथाकथित विकास प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. शक्तिपीठ महामार्ग, वाढवण बंदर प्रकल्प आणि सुरजागड जंगलातील खनिज संपत्तीच्या लुटीची उदाहरणे देत त्यांनी हे प्रकल्प शेतकरी, पर्यावरण आणि आदिवासींचे मोठे नुकसान करत असल्याचे नमूद केले.

डॉ. नवले यांनी स्पष्ट केले की, हे सर्व प्रकल्प लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना पायदळी तुडवून केवळ कॉर्पोरेट हितसंबंधांसाठी राबवले जात आहेत. या लुटीला कोणाचाही विरोध राहू नये, आंदोलने उभी राहू नयेत, म्हणूनच जनसुरक्षा कायदा आणण्यात आला आहे, असे ते म्हणाले. हा कायदा शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला, विद्यार्थी, युवक व कष्टकरी वर्गाची बाजू घेणाऱ्या संघटनांना लक्ष्य करण्यासाठी वापरण्यात येणार असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. लोकशाहीच्या रक्षणासाठी माकपने राज्यभरात व्यापक जनजागृती अभियान हाती घेतले असून, सर्व लोकशाहीवादी व्यक्ती आणि संघटनांनी या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

**काँग्रेसचे पुण्यात आंदोलन**

पुण्यात काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या कायद्याच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केले. शिंदे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, संविधानिक मूलभूत अधिकारांचा गळा घोटणारा जनसुरक्षा कायदा सरकारने बहुमताच्या जोरावर मंजूर केला. हा कायदा म्हणजे लोकशाहीचा अपमान असून, यामार्फत सरकार आपल्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांना दडपून टाकणार आहे. ते पुढे म्हणाले की, सरकारविरोधात बोलणारे विरोधी पक्ष, सामाजिक संघटना, कार्यकर्ते आणि नागरिक जर न्यायासाठी संविधानिक मार्गाने आंदोलन करत असतील, तर त्यांच्यावर कोणतीही चौकशी न करता त्यांना थेट तुरुंगात टाकण्याचा अधिकार या कायद्यामुळे सरकारला मिळाला आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरवादी विचारसरणीच्या संघटना, तसेच पुरोगामी, शेतकरी आणि कामगार चळवळींशी संबंधित संघटनांना संपवण्यासाठी आणि दबावाखाली आणण्यासाठीच सरकार या कायद्याचा वापर करणार आहे, असा स्पष्ट इशाराही शिंदे यांनी दिला. या आंदोलनात अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊंचे मोलाचे योगदान- ससाणे



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे महत्वाचे योगदान होते, त्यांनी आपल्या साहित्यातून शोषितांच्या व्यथा प्रभाविपणे मांडल्याचे जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे यांनी सांगितले.

श्रीरामपूर शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी कार्यक्रम प्रसंगी ससाणे बोलत होते. याप्रसंगी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, पंडितराव बोंबले, माजी नगरसेवक दिलीप नागरे, राजेंद्र सोनवणे, अरुण मंडलिक, के. सी. शेळके, प्रवीण नवले, अशोक जगधने, रितेश एडके, डॉ. राजेंद्र लोंढे, रावसाहेब आल्हाट, सुरेश ठुबे, सुनील साबळे, रज्जाक पठाण, फ्रान्सिस शेळके, रितेश चव्हाणके, सरबजीतसिंग चुग, नवाज जहागीरदार, वैभव पंडित, बाबा वायदंडे, मेजर औटी, संजय गोसावी, योगेश गायकवाड, विशाल साळवे, राजेश जोंधळे, शुभम गुजर, कल्पेश पाटणी आदी मान्यवर उपस्थित होते.

# बंद पडलेले आधारकेंद्र पूर्ववत करा- डॉ. झळके

**सिन्नर (वार्ताहर)–** शहरात आधारकार्ड केंद्रांची संख्या वाढवावी तसेच बंद असलेले आधार केंद्र पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्यामसुंदर झळके यांनी नायब तहसीलदार सागर मुंदडा यांना निवेदन देत केली आहे.

आधार अद्ययावत करण्यासाठी सध्या खासगी सायबर कॅफे मध्ये झुंबड उडाली आहे. शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात कामासाठी, आधारकार्ड सादर करावे लागते. त्यात दुरुस्ती अथवा फेरबदल करण्यासाठी आधार केंद्रात जावे लागते. मात्र, शासकीय आधार केंद्र बंद असल्यामुळे लोकांना नवीन कार्ड अथवा अपडेट करण्यासाठी खासगी सायबर कॅफे मध्ये जाऊन मागेल ती रक्कम देऊन काम करून घ्यावे लागते. सिन्नरमध्ये एकमेव बँक ऑफ बडोदा मध्ये आधार केंद्र सुरू आहे. मात्र, तेथेही गर्दी होत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. आधार अपडेट करण्यासाठी जन्मतारखेचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला सादर करण्याचा नवीन नियम केल्यामुळे अनेकांची पंचायत झाली आहे व त्यामुळे कोणत्याच शासकीय सवलतींचा त्यांना लाभ मिळत नाही. जन्माच्या दाखल्याअभावी हजारो नागरिक शासकीय सवलतींपासून वंचित आहेत.

# तळेगावमध्ये लोकशाहिरांना स्मृतिदिनी अभिवादन

**तळेगाव दिघे (वार्ताहर)–** संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात लेखक, कवी, समाजसुधारक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करीत अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एच. आर. दिघे होते. प्रसंगी पर्यवेक्षक बी. सी. दिघे व ज्येष्ठ शिक्षक सुनील घुले यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करीत अभिवादन करण्यात आले. उपमुख्याध्यापक संजय दिघे, एकनाथ जोंधळे, दिलीप ताजणे, बाबा जगताप, प्रभाकर जोरी, बी. एस. फटांगरे, मच्छिंद्र कासार, कैलास गिरी, संजय डोंगरे, सुनील दिघे, नीलेश भिडे, योगेश गांगुर्डे, राम गायकवाड, रवीकिरण जोंधळे, महेश उगार, राकेश झनान, भूषण जाधव, संजय आर. दिघे, यूवराज गायकवाड, गोरख दिघे, अश्विनी बिऱ्हाडे, आशा पन्हाळकर, अश्विनी कुऱ्हाडे, तुकाराम सोळसे, मच्छिंद्र सोनवणे, शालन उगले, शोभा गुंजाळ, शीतल कडलग, अण्णासाहेब कोटकर, गणेश दिघे, प्रमिला घायतडकर, धनश्री दिघे, सुनील थेटे, अविनाश बिऱ्हाडे, संदीप देशमुख, संभाजी सुर्वे, भाऊसाहेब दिघे, ओंकार भागवत आदी उपस्थित होते.

## पान १ वरुन

### आमदारांच्या कार्यकर्त्यांना विधीमंडळ परिसरात बंदी

आणि शासकीय अधिकाऱ्यांनाच विधानभवनात प्रवेश असेल, असं नार्वेकर म्हणाले. त्यांनी आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांना दिलगिरी व्यक्त करण्याच्या सूचना दिल्या. यानंतर दोन्ही आमदारांनी घडलेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली. विशेष म्हणजे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही संताप व्यक्त केला. नार्वेकर यांनी आव्हाड यांना दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितल्यावर आव्हाड यांनी मी काल एकटाच आलो होतो. माझ्यासोबत कोणीही आलेलं नव्हतं. त्यामुळे सदनाच्या रेकॉर्डवर चुकीची माहिती येऊ नये, असं म्हणत बाजू मांडली. त्यावर तुम्ही दिलगिरीवर बोला, असं नार्वेकर म्हणाले. तेव्हा राष्ट्रवादी शपचे आमदार जयंत पाटील यांनी त्यांना त्यांची बाजू मांडू द्या, अशी विनंती केली.

आव्हाडांसाठी जयंत पाटील उभे राहिलेले असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी हस्तक्षेप केला. या प्रकरणावर राजकारण करणं योग्य नाही. आपण कधीतरी राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करणार आहोत की नाही, असा सवाल मुख्यमंत्र्यांनी विचारला. काल घडलेल्या प्रकारानंतर सगळ्यांवरच टीका होत आहे. केवळ पडळकर, आव्हाडांवर टीका होत नाही. सगळ्याच आमदारांवर टीका होत आहे. आमदार माजलेत अशा प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत, असं फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी खडे बोल सुनावताच आव्हाडांनी दिलगिरी व्यक्त केली. नितीन देशमुख माझ्यासोबत आलेला नव्हता. मारहाण झाली तेव्हा मी तिथे नव्हतो. मी मरीन लाईन्सला होतो. पण जो प्रकार झाला, तो चुकीचा आहे. त्याबद्दल मला वाईट वाटतं, असं आव्हाड म्हणाले. यानंतर या सगळ्या वादावर पडदा पडला.

### कांदा धोरण समितीत जिल्ह्यातील दोघांचा समावेश

राजुरी येथील शेतीतज्ज्ञ आणि फार्म डीएसएस ॲग्री टेक कंपनीचे बाबासाहेब गोरे यांची निवड करण्यात आली आहे.

ही समिती कांद्याचे दर स्थिर ठेवणे, साठवणूक क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी उपाययोजना सुचवणार आहे. कांद्याचे क्षेत्र वाढत असून, समिती पुरवठा साखळीचे विश्लेषण करून ४५ दिवसांत अहवाल सादर करेल. याबाबतचे परिपत्रक सहकार व पणन विभागाने जारी केले आहे.

देशातील प्रमुख कांदा उत्पादक राज्य महाराष्ट्र असून, अहिल्यानगर, नाशिकसह राज्यात ३४ टक्के कांदा उत्पादन होते. जागतिक स्तरावर भारत मोठा कांदा निर्यातदार देश असून, महाराष्ट्रातून ४० टक्के कांदा निर्यात होतो. देशांतर्गत कांद्याचा पुरवठा आणि निर्यात निश्चित करण्यात महाराष्ट्राचा वाटा महत्त्वाचा असतो. कांदा उत्पादनात आघाडीवर असूनही शेतकऱ्यांना विविध संकटांचा सामना करावा लागतो. किमतीतील चढ–उतार, साठवणुकीसाठी पायाभूत सुविधांचा अभाव, निर्यातीवरील निर्बंध आणि काढणीपश्चात नुकसान या कारणांचा फटका बसत आहे. आयात–निर्यात धोरणातील बदलामुळे कांदा उत्पादक शेतकरी आणि व्यापारी अडचणीत येतात. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कांदा धोरण समिती नेमली आहे. कांदा उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या लागवड पद्धती, बियाणे, भौगोलिक वातावरणानुसार कांदा उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि त्यांचा उत्पादनावर होणारा परिणाम याचे सखोल विश्लेषण समिती करणार आहे.

### संगमनेरला नाफेडचे, पारनेरला एनसीसीएफचे खरेदी केंद्र

▶ आणि सहाय्यक निबंधक हे सदस्य सचिव राहणार आहेत. याबाबतचे आदेश सहकार विभागाच्यावतीने शुक्रवारी काढण्यात आले आहेत.

**दक्षता पथकाची कार्यप्रणाली निश्चित**

▶ नाफेड आणि एनसीसीएफच्या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांच्या नोंदी सप्लाय व्हॅलीड पोर्टलवर करण्यात आलेल्या आहेत?. नोंदीण केलेल्या शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांनी कांदा विक्री केलेली आहे? किती नोंदणीकृत शेतकऱ्यांचा कांदा विक्री प्रलंबित आहे. तसेच नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांनी किती दिवसात विक्रीस पात्रतेचे मेसेज प्राप्त होता. खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या सात–बाऱ्यावर पिक पेरामध्ये कांदा पिकाची नोंद आहे?. कांदा नोंदणी व खरेदी करतेवेळी स्वत: शेतकरी किंवा त्यांचे कुटुंबातील व्यक्ती हजर होते? शेतकऱ्याला खरेदी केलेल्या कांद्याची वजन पावती दिली जाते? व सदर पावतीनूसार शेतकऱ्यांची कांदा विक्री सप्लाय व्हॅलीड पोर्टलवर दिसते? खरेदी केलेल्या कांद्याचे पैसे डीबीटीद्वारे खरेदीनंतर किती दिवसांनी शेतकऱ्यांना प्राप्त होतात. साठवणूक गोदामातील कांदा हा एफएक्यू दर्जाचा आहे? सप्लाय व्हॅलीड पोर्टलनूसार एकूण खरेदी केलेला कांदा व गोदामात असलेल्या कांदा याचा हिशोब सर्वसाधारणपणे जुळता? तपासणी वेळी उपस्थित शेतकरी किंवा कोणी तक्रारी केल्या आहेत काय हे काम दक्षता समितीला करावे लागणार आहे. दक्षता पक्षकाचे कार्यप्रणाली सहकार विभागाने ठरवून दिलेली आहे.

### २३९.८० कोटींच्या निधीला मंजुरी

महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा रेल्वे प्रकल्प प्रत्यक्षात येणार आहे. त्याचा दूरगामी फायदा राज्याच्या विकासाला होणार आहे.

सध्या पुणतांबा–साईनगर शिर्डी हा रेल्वे मार्ग एकल आहे. त्याचा वापर केवळ १९.६६ टक्के इतकाच होत आहे. परंतु भविष्यात याच मार्गावर प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर दुहेरीकरण न झाल्यास या मार्गावरचा ताण ७९.७० टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे आधीच रेल्वे सेवा असलेल्या या मार्गावर दुहेरी ट्रॅकची गरज होती, ती आता पूर्ण होणार आहे.

साईनगर शिर्डी ते पुणतांबा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरण प्रकल्प सन २०२४–२५ च्या अम्ब्रेला वर्क फॉर मल्टी–ट्रॅकिंग या योजनेंतर्गत राबवण्यात येणार आहे. यामार्फत रेल्वेची वाहतूक क्षमता वाढवणे, वेळेचे नियोजन अधिक अचूक करणे आणि प्रवाशांना दिलासा देणे हे उद्दिष्ट आहे.

**शिर्डीच्या दर्शनासाठी रेल्वे प्रवास होणार अधिक सुलभ**

शिर्डी हे देशातील एक महत्त्वाचे धार्मिक केंद्र आहे. दरवर्षी लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी येथे येतात. दुहेरीकरणामुळे या मार्गावर अधिक गाड्या चालवता येतील, परिणामी गर्दीचे व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे होईल.

**अर्थव्यवस्थेलाही मिळणार चालना**

या रेल्वे प्रकल्पाचा फायदा केवळ भाविकांनाच नव्हे तर विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी आणि रोजंदारीवर प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांनाही होणार आहे. शेतकऱ्यांच्या मालाची वाहतूक जलद होईल, व्यापाऱ्यांना बाजारपेठांपर्यंत सहज पोहोचता येईल आणि या मार्गावरील ग्रामीण भागांनाही विकासाच्या प्रवाहात सहभागी होता येईल.

### कौटूंबिक वादातून पतीची चाकूने छातीवर वार करत आत्महत्या

तातडीने रुग्णवाहिका बोलावून दोघांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल नेले. तेथील डॉक्टरांनी अनिल खरवाल याला तपासून तो औषधोपचारापूर्वी मयत झाला असल्याचे घोषित केले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांच्या अहवालावरुन आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर किरण खरवाल हिचेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पती–पत्नीमध्ये नेमका कशावरून वाद झाला? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

### खासगी शाळेतील शिक्षकांच्या वेतनासाठी ९७०.४२ कोटीच्या खर्चास मान्यता

तातडीने रुग्णवाहिका तुकड्यांमधील ४९ हजार ५६२ शिक्षकांना लाभ होणार आहे. याशिवाय २ हजार ७१४ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नव्याने २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. हे वेतन अनुदान १ ऑगस्ट २०२५ पासून लागू होणार आहे.

तसेच अनुदानाच्या निकषानुसार अपात्र होणाऱ्या शाळा व तुकड्यांना स्वयं अर्थसहाय्यीत अधिनियमांच्या तरतूदीनुसार विवक्षित शाळा म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आल्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी निवेदनाद्वारे सांगितले.

### जलजीवनमध्ये कोट्यवधींचा घोटाळा, खासदारांचा आरोप

द्यावेत, असे थेट आव्हान खा. नीलेश लंके यांनी दिशा समितीच्या बैठक जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाला दिले.

दरम्यान, जलजीवनच्या कामाची तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती नेमण्यात यावी, या समिती दोनही खासदारांच्या वतीने दोन तांत्रिक सहायक नेमावेत, अशी मागणी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी यावेळी केली. शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात केंद्र सरकारच्या योजना आणि निधीतून राबवण्यात येणाऱ्या विकास कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा विकास समन्वय समितीची (दिशा समितीची) बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, वन संरक्षक सिध्दाराम सालीविठ्ठल, मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह सर्व शासकीय विभागाचे प्रमुख उपस्थित होते. बैठकीच्या सुरूवातील रोजगार हमी योजना, घरकुल, महावितरण विभागाच्या कामाची दोनही खासदारांनी वेगवेगळ्या विभागांची झाडाझडती घेतली. यावेळी जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या जलजीवन योजनेचा विषय निघाला. त्यावर आक्रमक झालेले खा. लंके यांनी जिल्हा परिषदेच्या जलजीवन योजनेत प्रचंड घोटाळा झाला असून त्याच्या चौकशीसाठी खा. सी. आर. पाटील यांना यांच्या माध्यमातून नगर जिल्ह्यातील कामे तपासणीसाठी केंद्रीय समितीला जिल्ह्यात पाहणी करण्यासाठी बोलवण्यात आले. या केंद्रीय समितीला अधिकाऱ्यांनी मॅनेज केले. पाथर्डीतील पाणी पुरवठा विभागाच्या एका उपअभियंत्याने केंद्रीय तपासणी समितीला अरेरावी केली. यामुळे संबंधीत अधिकाऱ्याचे निलंबन व्हावे, जलजीवन योजनेतील कामाचे बिल काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या नियमित कार्यकारी अभियंत्याला १०० दिवस सुट्टीवर पाठवण्यात आले. त्याचा कार्यभार दुसऱ्या मर्जीतील अधिकाऱ्याकडे सोपावून त्याकडून शेकडो कोटींची बिल काढण्यात आली असा गंभीर आरोप खा. लंके यांनी बैठकीत केला. या विरोधात राज्यपाल यांच्याकडे तक्रारी केलेली असून संसदेत देखील या विषयी आवाज उठवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

अकोले तालुक्यात साकीरवाडी गावात या योजनेचे काम अपूर्ण असताना पूर्ण दाखवून बिल काढण्यात आल्याचा आरोपी सुनिता भांगरे यांनी केला. दरम्यान, जिल्हा परिषदेत मागील महिन्यांत कामावर रुज झालेले पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यु. ए. चव्हाण यांनी आतापर्यंत जिल्हा परिषदेने जलजीवनच्या कामापोटी ९१३ कोटी रुपयांचे बिल अदा केलेले आहे. यात राज्य सरकारकडील २७ कोटींचा हिस्सा असून उर्वरित केंद्र सरकारचा निधी असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर लंके यांनी मंजूर कामांपैकी ८५ टक्के बिल अदा केले असून बिल अदा केलेल्या योजनांचे ८५ टक्के कामे पूर्ण झालेली नाहीत. अखेर खा. वाकचौरे यांनी या विषयावर स्वतंत्र चौकशी करून याबाबत केंद्र सरकारला अहवाल देण्यात येणार असल्याचे सांगितले.

**‘माध्यमिक’ची लाचलुचपत मार्फत चौकशी व्हावी**

बैठकी खा. वाकचौरे यांनी माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षकांच्या पदाला मान्यता देतांना लाखो रुपयांची मागणी करण्यात येते. या ठिकाणी सुशिक्षीत बेरोजगारांची लुट सुरू आहे. यामुळे माध्यमिक शिक्षण विभागाचे लाचलुचपत विभागामार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. या ठिकाणचे चित्र भयानक व विदारक असल्याची टिप्पणी खा. वाकचौरे यांनी केली.

ग्रामसडक योजनेच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची हजेरी

बैठकीला पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता यांनी सेवानिवृत्त झालेल्या आणि महिनाभरापूर्वी कंत्राटी सेवक म्हणून रूजू झालेल्या एका अधिकाऱ्याला बैठकीला पाठवले. बैठकीत पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या कामाबाबत माहिती विचारताच संबंधीत कर्मचाऱ्याने मी कंत्राटी असल्याचे सांगितले. त्यावर खा. वाकचौरे यांनी आता तुमच्यावर काय कारवाई करता येणार, या शब्दात नाराजी व्यक्त केली.

**महावितरणबाबत बोंबाबोंब**

महावितरणच्या कारभाराची जिल्ह्यात बोंबाबोंबच चालू आहे. या विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार बैठक घेण्याचे सांगून देखील ते बैठक घेत नाही, असे खा. वाकचौरे म्हणाले. यावेळी खा. लंके यांनी आरडीएस ही योजना राबविली जात नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करून याबाबत महावितरणच्या दारात उपोषणाचा इशारा दिला. २३१ कोटींची योजना राबविली जात नाही. अधिकारी काय काम करता असा सवाल करून त्यांनी लोकसभेत याबाबत आवाज उठविणार असून अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करणार असल्याचे स्पष्ट केले.

### जिल्ह्यातील ३० ग्रामपंचायतींना मिळणार नवीन इमारत

योजनेसाठी रु.३२४,२८,००,०००/- (रुपये तीनशे चोवीस कोटी अठ्ठावीस लक्ष फक्त) एवढ्या रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र को–लोकेशन खोली बांधकामाकरीता एकूण ५०० ग्रामपंचायतींच्या यादीस केंद्र शासनाने यापूर्वीच मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाच्या निकषानुसार नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामासाठी एकूण रु.२५.०० लक्ष रुपये (ग्रामपंचायत इमारत बांधकामसाठी रु.२०.०० लक्ष आणि नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामसाठी रु.५.०० लक्ष असे मिळून) या योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येतील.

मंजूर केलेल्या इमारत बांधकाम आराखडा व दिलेल्या सूचनांचे अधीन राहून सदरचे नवीन ग्रामपंचायत इमारतींचे बांधकाम करण्यात यावे. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्द क्र. ९ व १० नुसार नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम आराखड्यात जागेच्या उपलब्धतेनुसार आवश्यक बदल करण्याबाबत सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने योग्य तो निर्णय घ्यावा, असे सूचविण्यात आले आहे.